M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र.मुंविमं/यो.प्र./ ४०९७
दिनांक : ८/१०/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
मुंबई विभागीय मंडळ,वाशी,नवी मुंबई

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र कार्यवाहीबाबत ...

संदर्भ:- राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/३३८६ दि.०३/१०/२०२५ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानूसार CBSC/ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत सोबत दिलेल्या संदर्भिय पत्रानूसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत : संदर्भिय पत्र

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
(प्र.)विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,वाशी नवी मुंबई - ४०० ७०३.

प्रत माहितीस्तव :- मा.सचिव,राज्यमंडळ पुणे

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./संशोधन/3386
पुणे – 411004
दिनांक – 03/10/2025

प्रती,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे

विषय – शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE/ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र कार्यवाहीबाबत.

संदर्भ – 1) क्र. रा. मं / संशोधन /2302/दिनांक 26/06/2025
2) क्र. रा. मं / संशोधन / 2492/ दिनांक 10/07/2025

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आणि संदर्भीय पत्र क्र. २ नुसार दिलेल्या सुचानामध्ये अंशतः बदल करण्यात येत आहे सुधारित सूचना खालीलप्रमाणे कळविण्यात येते की,

१. इ.११ वी व इ.१२ वी साठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE/ICSE बोर्डाचे विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठी कोणतेही आवेदन पत्रे व इतर कागदपत्रे घेण्यात येऊ नये. फक्त गुणपत्रिकाची प्रमाणित केलेली छायांकित प्रत घेण्यात यावी. तसेच योग्यता प्रमाणपत्रासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयाकडून संबधित विद्यार्थ्याची यादी , छायांकित गुणपत्रिका प्रत प्राप्त करून व निर्धारित शुल्क रु. १०००/- प्रति विद्यार्थी भरणां करून विद्यार्थ्याच्या नावाची यादी स्वीकारण्यात यावी.

२. मा. शिक्षण संचालक कार्यालयाकडून CBSE/ICSE विद्यार्थ्याच्या नावाची यादीची वाट न पाहता संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून CBSE/ICSE विद्यार्थ्यांची नावांची यादी , फक्त गुणपत्रिकाची प्रमाणित केलेली छायांकित प्रत व निर्धारित फी स्विकारण्यात यावी.

३. कनिष्ठ महाविद्यालयाकडून CBSE/ICSE विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या नावाची यादी/प्रस्ताव नुसार संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीहाय नावाची यादी तयार करून मंडळामार्फत समकक्षतेबाबत मान्यता दिल्याचे पत्राद्वारे संबधित कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात यावे.

४. मा. उपशिक्षण संचालक कार्यालयाकडून विभागीय स्तरावर CBSE/ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांची इ. ११ वी प्रवेशाबाबतची यादी मागविण्यात यावी , सदर यादी प्राप्त झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालय /शाळा मार्फत प्राप्त यादीनुसार विभागीय मंडळ स्तरावर पडताळणी करण्यात यावी व पुढील कार्यवाही करण्यात यावी.

५. CBSE/ICSE बोर्डाव्यतिरिक्त इतर बोर्डातील विद्यार्थ्याच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाची प्रचलित पद्धतीने ऑनलाईन प्रणालीद्वारे आवेदनपत्रे, कागदपत्रे स्वीकारून त्याची पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

६. इ. १२ वी साठी थेट प्रवेश घेणारे CBSE/ICSE विद्यार्थी जे ऑनलाईन प्रक्रियेमध्ये येत नाही (उदा. खाजगी विद्यार्थी, १७ नं. फार्म भरून प्रवेश घेणारे विद्यार्थी, सैनिकी शाळा, आश्रम शाळा ई.) अशा CBSE/ICSE

Scanned with OKEN Scanner

विद्यार्थ्याचे सुद्धा आवेदन पत्र व इतर कागदपत्र न स्वीकारता फक्त गुंपात्रीकांची छायांकित प्रत व निर्धारित शुल्क रु. १०००/- व यादी स्वीकारण्यात यावी व संबधितास पत्राद्वारे मान्यता दिल्याचे कळविण्यात यावे.

७. तसेच इ. ११ वी साठी प्रवेश घेणारे CBSE/ICSE विद्यार्थी वगळून इतर बोर्डाचे विद्यार्थी ज्यांचे ऑनलाईन पोर्टल द्वारे प्रवेश होत नाही (उदा.सैनिकी शाळा,आश्रम शाळा ई.) अशा विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र मिळणेसाठी कार्यरत प्रणाली द्वारे अर्ज स्वीकारण्यात यावे.

८. तसेच गतवर्षी म्हणजेच इ.११ वी ला प्रवेश घेतलेल्या CBSE/ICSE विद्यार्थ्यांना त्यावेळी योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरला नसेल व इ. १२ वी साठी योग्यता प्रमाणपत्र मिल्नेसाठी यादी मध्ये नाव प्रात होत असेल तर अशा विद्यार्थ्यांना (भारतीय विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्राचे नियमित शुल्क रु १००० + विलंब शुल्क रु. १००/- व त्यानंतर म्हणजेच दिनांक १ डिसेंबर पासून पुढे योग्यता प्रमाणपत्रासाठी यादी सादरकरीत असेल तर त्या दिनांकापर्यंत प्रतिदिन प्रती विद्यार्थी रु. २०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क आकरण्यात यावे तसेच परदेशी विद्यार्थी यांना योग्यता प्रमाणपत्राचे नियमित शुल्क रु १५०० + विलंब शुल्क १००/- दिनांक १ डिसेंबर पासून पुढे योग्यता प्रमाणपत्रासाठी यादी सादरकरीत असेल तर त्या दिनांकापर्यंत अतिविलंब शुल्क प्रतिदिन प्रती विद्यार्थी रु.२०/- याप्रमाणे शुल्क आकरण्यात यावे.

९. कनिष्ठ महाविद्यालयाकडून CBSE/ICSE प्राप्त विद्यार्थ्यांच्या नावाच्या यादीमध्ये इतर बोर्डाचे विद्यार्थ्यांचे नाव समाविष्ठ करण्याचे नाकारता येत नाही, त्यामुळे खाली नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाकडून माहिती भरून तसेच गुणपत्रिका प्रमाणित केलेली छायांकित प्रत घेण्यात यावी.

अ .क्र	विद्यार्थ्याचे नाव	इ .११ वी प्रवेशाचे वर्ष किंवा इ .१२ वी प्रवेशाचे वर्ष	इ.१० वी/ इ ११ वी उतीर्ण झालेल्या मंडळाचे नाव	गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडली आहे/नाही	भरण्यात आलेले शुल्क रु.
१					
२					

उपरोक्त तक्त्यानुसार संबधित मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाकडून CBSE/ICSE विद्यार्थ्यांच्या नावांची प्रमाणित केलेली यादी व गुणपत्रिका प्रमाणित केलेली छायांकित प्रत स्वीकारण्यात यावी.

१०. CBSE/ICSE च्या विद्यार्थ्याने चुकून portal वर फार्म भरला असल्यास प्रचलित online पद्धतीने कार्यवाही करून त्यास पत्र करावे.

११. ज्या CBSE/ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यानाच्या नावांची यादी कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झली अश्या CBSE/ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र देण्यात येणार नसल्यामुळे संबधित विद्यार्थ्याकडून परीक्षेची आवेदनपत्रे भरताना योग्यता प्रमाणपत्राचा क्रमांक घेण्यात येऊ नये.

१२. मागील वर्षी ज्यांनी योग्यता प्रमाणपत्र घेतलेले आहे परंतु डाऊनलोड करायचे राहून गेले आहे त्यांना वेवसाईटवर २०२५ मधील सर्व योग्यता प्रमाणपत्राचे नंवर सर्व कनिष्ठ महाविद्यालयाना तसेच विभागीय मंडळांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

सचिव,
(देविदास कुलाळ)
राज्यमंडळ, पुणे

Scanned with OKEN Scanner